# भुजबळ नॉलेज सिटी

# मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, नाशिक - ४२२००३

## वाचन प्रेरणा दिन अहवाल २०१७

## मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी मध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

**तारीख :- १५ ऑक्टोबर २०१७.**

**वेळ -: श्री. विलास पगार सर यांचे ‘ वाचाल तर वाचाल ‘ या विषयावर व्याख्यान: दुपारी ३.०० वाजता**

**ग्रंथ प्रदर्शन: सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत**

**ठिकाण -: मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी.**

दिनांक १५ ऑक्टोबर भारताचे माजी राष्ट्रपती महामहीम भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्म दिवस. शासनाने त्यांचा जन्म दिवस दर वर्षी वाचन प्रेरणा दिवस म्हणून सर्व स्तरावरून साजरा व्हावा असा निर्णय २०१५ यावर्षी घेतला. वाचन संस्कृती वृद्धिगत व्हावी हा त्यामागचा उद्देश. या अनुषंगाने मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी मध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यामध्ये ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथ परीक्षण स्पर्धा, मराठी कवि श्री. विलास पगार सर यांचे ‘ वाचाल तर वाचाल ‘ या विषयावर आधारीत व्याख्यान इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते.

वाचन प्रेरणा दिनी म्हणजे १५ ऑक्टोबर रोजी मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी मध्ये ग्रंथ प्रदर्शन सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० पर्यन्त आयोजित करण्यात आले होते. माननीय प्राचार्य, आमंत्रीत मान्यवर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आदींनी ग्रंथ प्रदर्शनाची पाहणी करून त्याचा आस्वाद घेतला.

याच दिवशी दुपारी ३.०० वाजता, श्री. विलास पगार ह्यांचे वाचाल तर वाचाल ‘ या विषयावर आधारीत व्याख्यान आयोजन करण्यात आलेले होते. कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर हे होते. सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांनी प्रास्ताविक मांडले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन स्मिता कोथमिरे (एम. फार्म. एस. वाय.) व पियुष

इंगळे (टी. वाय. बी. फार्म) या विद्यार्थ्याने केले. निकिता ढोबळे या विद्यार्थिनीने डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्रा विषयी माहिती दिली. वाचनामुळे बौद्धिक ज्ञानात वाढ होऊन प्रगतीस चालना मिळते, आनंद प्राप्त होण्यासाठी वाचनासारखा दुसरा पर्याय नाही. विद्यार्थ्यामध्ये व समाजामध्ये वाचनाची आवड व पुस्तकाबद्दलची ओढ निर्माण करणे आवश्यक आहे, असे श्री. विलास पगार यांनी नमूद केले. या कार्यक्रमास १०६ विध्यार्थी आणि २६ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

ग्रंथालय विभागामार्फत यानिमित्ताने पुस्तक परीक्षण याविषयीची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ग्रंथालयात आलेल्या पुस्तक परीक्षणापैकी कापसे अर्चना (टी. वाय..बी.फार्म.), ढोबळे निकिता (टी. वाय..बी.फार्म.) तिडके सोनाली (एम. फार्म एफ. वाय. ) आणि पियुष इंगळे (टी. वाय. बी.फार्म.) आणि यांनी उत्कुष्ट शैलीत पुस्तक परीक्षण सादर केले. विजेत्या विद्यार्थ्यांचा श्री. विलास पगार यांच्या हस्ते पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला.

महाविद्यालयातर्फे ग्रंथपाल श्री नितीन भामरे यांनी आभार प्रदर्शन केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी, उपग्रंथपाल आरती कागदे व ग्रंथालय सहायक कर्मचारी ज्योती जाधव तसेच इतर कर्मचार्यानी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरता डॉ. सौ शेफाली भुजबळ व प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांचे मार्गदर्शन लाभले.

**कार्यक्रमाचे समन्वयक :-**

श्री. नितीन भामरे (ग्रंथपाल)

आरती कागदे (उपग्रंथपाल)

ज्योती जाधव (ग्रंथालय सहायक कर्मचारी)

# <u>वाचन प्रेरणा दिवस २०१७</u>



*प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर प्रमुख पाहुणे श्री. विलास पगार यांचा सत्कार करतांना*




*प्राचार्य डॉ. संजय  क्षीरसागर हे उपस्थित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी' व विद्यार्थ्यांना संबोधित करताना*




*पमुख वक्ते श्री. विलास पगार हे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी' व विद्यार्थ्यांना संबोधित करताना*




*ग्रंथपाल श्री. नितीन भामरे कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडताना*



*कार्यक्रमाला उपस्थित असलेले शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी' व विद्यार्थी*



ग्रंथ प्रदर्शन पाहतांना शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी' व विद्यार्थी